Indian Streams Research Journal
Vol -3 , ISSUE –1, Feb.2013
ISSN:-2230-7850
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

आशयासह अध्यापन पध्दतीची संरचना व पाठनियोजन

डॉ. वैजयंता पाटिल
संचालक व सहयोगी प्राध्यापक
शिक्षणशास्त्र संकुल
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड.

रविंद्र वाघमारे
एम.फिल. प्रशिक्षणार्थी
शिक्षणशास्त्र संकुल
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड.

१.१ प्रस्तावना :-

शिक्षण म्हणजे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होय. व्यक्तीचा सर्वांगीण विकास म्हटल्यावर त्यात बौध्दीक , मानसीक, शारिरीक, सामाजिक, भावनिक व सांस्कृतीक विकास अभिप्रेत आहे. शाळेमध्ये विद्यार्थ्यांचा बौध्दीक विकास हा अध्ययन अध्यापन प्रक्रियेतून घडून येत असतो. अध्यापक घडविण्याचे काम शिक्षक प्रशिक्षण संस्थेत केले जाते. जस जसे शिक्षणाचे स्वरुप बदलत आहे. तस तसे नवनविन विचारप्रवाह शिक्षणक्षेत्रात येत आहेत. आशयासह अध्यापन पध्दती हा एक शिक्षण प्रशिक्षणातील नवविचार प्रवाह होय प्रस्तुत शोध लेखात आशयासह अध्यापन पध्दतीची संरचना व पाठनियोजन या भागावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे.

१.२ आशयासह अध्यापन पध्दतीची संकल्पना :-

यामध्ये दोन बाबींचा समावेश होतो , एक आशय तर दुसरी अध्यापन पध्दती होय.

आशय :-

'आशय म्हणजे मनातील हेतू, अभिप्राय,संदेश होय.'

'विशिष्ट हेतू मनामध्ये धरुन संकलीत केलेली माहिती म्हणजे आशय होय.'

अध्यापन पध्दती :-

'प्रत्यक्ष अध्यापन करण्यासाठी ज्या पध्दतीचा वापर करतो त्यास अध्यापन पध्दती असे म्हणतात.'

'अध्यापन सुलभ करण्याची जी एक प्रक्रिया असते त्या प्रक्रियेस अध्यापन असे म्हणतात.'

आशययुक्त अध्यापन पध्दती :-

'विद्यार्थी वर्तनाचे निरिक्षणक्षम कौशल्याने परिभाषेत आशय आणि पध्दती यांचे अर्थपूर्ण रित्या केलेले एकात्मिकरण म्हणजे आशययुक्त अध्यापन पध्दती होय. '

'आशय व अध्यापन पध्दतींना समान महत्व देवून आशयाचे विश्लेषण करुन त्यानुरुप अध्यापन पध्दती निवडून जेव्हा अध्यापन केले जाते त्यास आशयुक्त अध्यापन पध्दती असे म्हणतात. '

१.३ आशययुक्त अध्यापन पध्दतीची संरचना :-

आशययुक्त अध्यापन पध्दतीची संरचना लक्षात घेताना खालील बाबी विचारात घ्याव्या लागतील -

१. विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान
२. आशय विश्लेषण
३. आशयानुरुप योग्य अध्यापन पध्दतीची निवड
४. आशयाची उदिष्टये व स्पष्टीकरणे
५. शिक्षक - विद्यार्थी कृती
६. आशयानुरुप शैक्षणिक साधनांची निवड
७. उद्दिष्टानुरुप विद्यार्थ्यांचे मूल्यमापन

वरील सर्व बाबीं लक्षात घेवून आशयासह अध्यापन पध्दतीसाठी पाठनियोजन केले जाते. या ठिकाणी आशययुक्त अध्यापन पध्दतीमध्ये केवळ कुठल्याही एकाच योग्य अध्यापन पध्दतीची निवड करणे अभिप्रेत नसून एका पेक्षा अधिक अध्यापन पध्दतीचा एकाच वेळी वापर करता येईल. पारंपरिक अध्यापन पध्दतीतून प्रस्तावना,हेतूकथन, विषय प्रतिपादन, संकलन, मूल्यमापन व गृहपाठ या पायऱ्यांचा आग्रह नसून शिक्षक यापैकी आवश्यक त्या पायऱ्या उपयोगात आणू शकतील.

१.४ आशयासह अध्यापन पध्दतीनुसार नमूना पाठ टाचण :-

इयत्ता : ६ वी
विषय :- विज्ञान
पाठ्यघटक :- मुळांचे प्रकार
विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान : - विद्यार्थ्यांना वनस्पतींच्या विविध अवयवांची माहिती आहे.
शैक्षणिक साधने :- सदाफुली, बाभूळ, गवत, साळ, मका, गहू इ. वनस्पतींची मुळे
अध्यापन पध्दती :- दिग्दर्शन पध्दती

वर्गाध्यापनाची उद्दिष्टये :-

उद्दिष्टये	**स्पष्टीकरणे**
ज्ञान	१. विद्यार्थी वनस्पतींच्या मुळांचे प्रकार सांगतो.
	२. विद्यार्थी सोटमुळाची व्याख्या सांगतो.
	३. विद्यार्थी तंतूमयमुळाची व्याख्या सांगतो.
	४. विद्यार्थी सोटमुळाची उदाहरणे सांगतो.
	५. विद्यार्थी तंतूमयमुळाची उदाहरणे सांगतो.
आकलन	१. विद्यार्थी सोटमुळाची माहिती स्पष्ट करतो.
	२. विद्यार्थी तंतुमयमुळाची माहिती स्पष्ट करतो.
	३. विद्यार्थी सोटमुळाची उदाहरणे सांगतो.
	४. विद्यार्थी तंतूमयमुळाची उदाहरणे सांगतो.
उद्दिष्टये	**स्पष्टीकरणे**
उपयोजन	१.विद्यार्थी सोटमूळ व तंतूमयमूळ यामधील फरक सांगतो.
	२.विद्यार्थी परिसरातील सोटमूळ असलेल्या वनस्पतींच्या नावांची यादी तयार करतो.
	३.विद्यार्थी परिसरातील तंतूमयमूळ असलेल्या वनस्पतींच्या नावांची यादी तयार करतो.
कौशल्य	१. विद्यार्थी सोटमुळाची सुबक व नामनिर्देशीत आकृती काढतो.
	२. विद्यार्थी तंतूमयमुळाची सुबक व नामनिर्देशीत आकृती काढतो.

प्रस्तावना :-

वनस्पतींच्या विविध अवयवांवर प्रश्न विचारुन त्यावर माहितीपर चर्चा करण्यात यावी. उदा- १. वनस्पतींचे प्रमुख अवयव कोणकोणते ? २. वनस्पतीचा जमिनीवर वाढणारा अवयव कोणता ? ३. वनस्पतीचा जमिनीच्या खाली वाढणारा अवयव कोणता ? इत्यादी विषयी चर्चा करावी.

मुळांचे प्रकार या आशयासाठी खालील प्रकारे दिग्दर्शन पध्दतीचा वापर करता येईल:-

पाठ्यघटकाचे विश्लेषण	शिक्षक कृती	विद्यार्थी कृती
सोटमूळ	१. बाभूळ , सदाफुली, कापूस इ. वनस्पतींची मुळे विद्यार्थ्यांना दाखवतील.	वनस्पतीची मुळे पाहतील.
	२. प्रत्येकास पाहता येईल अशा गटातून वनस्पतीची मुळे वाटतील व निरिक्षण करण्यास सांगतील.	वनस्पतीच्या मुळाचे निरिक्षण करतील.
	३. सोटमुळाचा भाग दाखवून आदिमूळ , उपमूळ, दुय्यम मुळे, इ. दाखवतील. या तिन्ही भागांची नावे सांगतील ती क्रमाने फळ्यावर लिहितील.	सोटमुळाच्या भागांची नावे नोंदवून घेतील.
	४. क्रमाने एकेका सोटमुळाच्या भागाचे दिग्दर्शन करतील. सोबत सोटमुळाच्या आकृतीचा वापर करतील.	एकेक भाग व्यवस्थितपणे पाहुन समजावून घेतील.
	५. सोटमुळाची आकृती काढावायास सांगतील.	वहीवर आकृती काढून घेतील.
	६. सोटमुळाची कल्पना विविध उदाहरणावरुन स्पष्ट करतील.	व्याख्या सांगतील व उदाहरणे वहीत नोंदवून घेतील.
तंतूमयमूळ	७. गवत, मका, साळ, ज्वारी, इ. वनस्पतींची मुळे दाखवतील.	वनस्पतींची मुळे पाहतील.

पाठ्यघटकाचे विश्लेषण	शिक्षक कृती	विद्यार्थी कृती
	८. प्रत्येकास पाहता येईल अशा गटातून वरील वनस्पतींची मुळे वाटतील व निरिक्षण करण्यास सांगतील.	तंतूमयमुळांचे निरिक्षण करतील
	९. तंतूसारखी बारीक मुळे विद्यार्थ्यांना दाखवतील.	तंतूमय मुळे पाहतील.
	१०.तंतूमयमुळाच्या भागाचे आकृती व्दारे दिग्दर्शन करतील.	विद्यार्थी तंतूमय मुळांची माहिती समजावून घेतील.
	११. तंतूमयमुळाची आकृती काढावयास सांगतील.	तंतूमयमुळाची वहीत आकृती काढून घेतील.
	१२.तंतूमयमुळाची कल्पना विविध उदाहरणांवरुन स्पष्ट करतील.	तंतूमयमुळाची व्याख्या सांगतील व वहीत उदाहरणे लिहून घेतील.

शिक्षक पुनरावृत्ती म्हणून प्रत्येक भागांवर प्रश्न विचारतील. परिसरातील मुळांचे याप्रमाणे निरिक्षण करुन यादी तयार करण्याची सुचना देतील.

आशययुक्त अध्यापनपध्द्तीचे फायदे :–

विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व घडवण्यात शिक्षकाची महत्वाची भुमीका असते. या कार्यासाठी शिक्षकाला सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच शिक्षणप्रक्रियेकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोन नविन हवा यासाठी आशययुक्त पध्द्ती आवश्यक आहे. थोडक्यात शिक्षकाच्या ज्ञानकक्षा रूंदावण्यासाठी अध्यापन करण्याच्या आशयाकडे बघण्याच्या दृष्टीसाठी त्यांच्या अध्यापनाचा दर्जा उंचावण्यासाठी परंपरागत पध्द्तीपेक्षा नवनविन अध्यापनपध्द्तीची आशययुक्त निवड करून अध्यापन करण्यासाठी या पध्द्तीचा फायदा होतो.

संदर्भ सूची :-

१. डॉ. प्रभाकर हकीम, विज्ञानाचे आशययुक्त अध्यापन (२००६), नित्यनुतन प्रकाशन, पुणे-
२. प्रा. गजानन पाटील, भुगोल आशयुक्त आध्यापन पध्दती (१९९९), निराली प्रकाशन, पुणे.
३. डॉ. द.बा. पोक्षे , भुगोलातील, पाठ्यांश- पध्दती एकात्मता (१९९८), नुतन प्रकाशन पुणे.
४. M.S. Yadav, Teaching of Science (२००४), Anmol Publication New Delhi ,
५. J.C. Sharma, B.D. Shaida, Teaching of Geography (२००५), Dhanpat Rai Publishing Company , New Delhi.